ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

ENGLISH / MARATHI PART - II / HINDI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

108

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com) AP-2

# ९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्त्रीवाद

डॉ. राजेंद्र नामदेव रासकर
इतिहास विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे.

## प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित, चळवळीतील प्रमुख नेते होते. त्याचप्रमाणे हिंदू समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने झटणारे एक थोर समाज सुधारक, समाज जीवनात वेळोवेळी निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने सखोल अभ्यास करून त्यावर भाष्य करणारे एक व्यासंगी व निस्पृह विचारवंत आणि स्वतंत्र भारताच्या घटनेचे शिल्पकार म्हणून सर्वांना परिचित आहेत. भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेऊन देशासाठी व समाजासाठी अहोरात्र कार्य करून सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जपलेली आहे. त्यांच्या सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरलेले आहे. अशा या थोर महापुरुषांच्या मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात प्रथम आहे.

मानवजातीच्या इतिहासातइतका स्त्री जातीवरील अत्याचार सनातन आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीला जीवनात मुलगी, पत्नी, आई, सून, सासू अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात. स्त्रीला लहानपणी वडिलांच्या छायेत, तरुणपणी पतीच्या छायेत आणि म्हातारपणी मुलांच्या छायेत आपले आयुष्य घालवावे लागते. स्त्रीने कुटुंबासाठी स्वतःचे अस्तित्व विसरून दुसऱ्यांची सेवा सुश्रुषा करणे यात आपले आयुष्य खर्च केले आहे. स्त्रियांची गुलामी आणि स्त्रीमुक्ती यांचा सखोल अभ्यास देशातील अनेक समाजसुधारकांनी केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यातील एक समाज सुधारक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीच्या चळवळीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

## प्राचीन कालखंडातील स्त्री जीवन

प्राचीन कालखंडामध्ये स्त्रियांना वेदमंत्र शिकवले जात होते. पाणिनीच्या अध्यायामध्ये स्त्रिया गुरुकुलामध्ये राहून वेद व मीमांसामध्ये प्राविण्य संपादन करीत असत असा उल्लेख आहे. थोडक्यात वेद कालखंडामध्ये स्त्रिया शिक्षण आणि ज्ञान या क्षेत्रात उच्च पदावर होत्या. हे लक्षात येते. त्या कालखंडामध्ये स्त्रियांना मानाचे स्थान होते. राज्याभिषेकाच्या वेळी पत्नीचे कार्य महत्त्वाचे मानले जात होते. राज्याभिषेकाच्या वेळी राजा आपल्या राणीचा तर पूजा करीत असे पण कनिष्ठ जातीच्या आपल्या इतर पत्नीचा सन्मान करीत असे.



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

7. **अज्ञानतत्व व पालकत्व**

हे सातही विषय स्त्रियांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहेत. या बिलातील घटस्फोट, द्विभार्या विषय कलमांना सनातनी मनोवृत्तीच्या विरोधकांनी प्रचंड विरोध केला होता. सुधारणेच्या युगात स्त्रियांना समान हक्क नाकारत आहात असा सवाल दिनांक १७ सप्टेंबर १९५१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विरोधकांना केला. हिंदू कोड बिल संमत व्हावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकटेच योद्ध्यासारखे लढले पण दुर्दैवाने सत्र संपताना या बिलाची केवळ ४ कलमे मंजूर झाली. त्यामुळे अत्यंत दुःखी होऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी २७ सप्टेंबर १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. बाबासाहेबांचे कष्ट निरर्थक ठरले नाहीत ज्या वारसा कायद्याला विरोध करण्यात आला होता तो बाजूला सारून प्रथम हिंदू विवाह कायदा हाती घेण्यात आला. हिंदू कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करून हे चारही कायदे वेगवेगळ्या वेळी नेहरूंनी मंजूर करून घेतले. १९५५-५६ मंजूर झालेले ४ हिंदू कायदे म्हणजे १) हिंदू विवाह कायदा २) हिंदू वारसा हक्क कायदा ३) हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा ४) हिंदू दत्तक व पोटगी कायदा हे कायदे मंजूर होणे म्हणजे कायद्याच्या इतिहासातली एक क्रांतिकारक घटना होती.

**स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या आर्थिकस्वातंत्र्याचा विचार सातत्याने केला. 'तुम्ही स्वच्छ रहा, सर्व दुर्गुणांचा पासून दूर राहा, मुलांना शिकवून महत्त्वकांक्षी बनवा, मुलींचे लग्न करण्याची घाई करू नका, त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहणे इतपत लायक बनवा या प्रकारचे विचार मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वर्गाच्या उदयोन्मुख पिढीची किती गंभीरता पूर्वक विचार करत होते त्याचे प्रत्यंतर यातून येते. विविध आंदोलन व चळवळीच्या निमित्ताने बाबासाहेबांनी स्त्रीवर्गाला डोळ्यासमोर ठेवून उद्बोधन केले हे उद्बोधन समस्त स्त्रीवर्गाला स्वतंत्र करू इच्छिणारे होते. याची साक्ष त्यांच्या विविध भाषांमधून पहावयास मिळते.

**अस्पृश्य महिलांचे प्रबोधन**

दलित समाजाला पशुतुल्य हीन वागणूक दिली जात होती. त्यामुळे दलितांचे जीवन अत्यंत दयनीय होते. अस्पृश्य पुरुष सवर्ण समाजाकडून पिळला जात होता. परंतु अस्पृश्य स्त्रियांचे सवर्ण-दलित समाजाकडून दुहेरी शोषण होत होते. त्यामुळे अस्पृश्य स्त्रियांच्या जीवनात अज्ञान, दुःख, दारिद्र्य होते. हा आंबेडकरांनी दलित स्त्रियांना मुक्त प्रवाहात आणण्याचे कार्य केले. डॉ. आंबेडकरांनी माहिती होते की दलित समाजाला जागृत करण्यासाठी प्रथम दलित महिलांचे प्रबोधन करणे महत्त्वाचे आहे. कारण स्त्री हा कुटुंबाचा आधार असते तिच्या सहकार्यांनी कुटुंब संस्कारित होते. अस्पृश्य महिलांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "ब्राह्मण स्त्री यांसारखे वागून आपल्या मुलांना समाजात नावलौकिक मिळवून द्यावा असा उपदेश दिला. वरिष्ठ वर्गाच्या स्त्रिया ज्या पद्धतीने साड्या नेसतात या पद्धतीने दलित स्त्रियांनी साड्या नेसण्याची प्रथा पाडली पाहिजे. असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते. त्याचप्रमाणे कथलाचे व चांदीचे दागिने



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

110

त्यांना प्रसुती विषयक बिलाला जोरदार पाठिंबा दर्शविला. त्यांच्या मते स्त्रीने बाळंत होण्याआधी व नंतर पुरेशी विश्रांती घेणे हे राष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचे होते. या बिलाच्या पाया याच तत्वावर आधारित होता.

डॉ. आंबेडकर आणि स्वातंत्र्य, समता व बंधुता या त्रिसूत्रीचा समावेश भारतीय संविधानात योग्य प्रकारे केला. जर समाजातील सर्व घटकांना व विचारधारांना प्रतिनिधीक मताधिकार नसेल तर हा राजकीय विरोधाभास ठरेल. असे सरकार टिकू शकणार नाही असा इशारा त्यांनी दिला. २५ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणात ते म्हणाले की "जर राजकीय लोकशाही व्यवस्था सामाजिक लोकशाहीच्या भक्कम पायावर उभी नसेल तर ती कधीही ढासळू शकेल". पुढे २६ जानेवारी १९५० च्या भाषणात ते खेदाने म्हणाले की "आज आपण या विरोधाभासाचा पर्वात प्रवेश करीत आहोत. राजकीयदृष्ट्या आपण एक व्यक्ती एक मूल्य या समानतेची पायमल्ली करीत आहोत.या असमानतेला जितक्या लवकर नाहीसे करता येईल तेवढे करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

समारोप

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे अतिशय ध्येयवादी वृत्ती ज्ञानलालसेने अक्षरशः प्रेरित झालेला अमर व उत्तुंग अशी विचारशक्ती ठेवणारा एक युगप्रवर्तक होय. डॉ. बाबासाहेब हे चालते बोलते विद्यापीठ होते. आपल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे त्यांच्या पूर्ण आयुष्याचे एकमेव ध्येय होते. सद्यस्थिती स्त्रियांवरील वाढते अत्याचार, वाढत्या स्त्री भ्रुन हत्या, सामाजिक अवमूल्यन, भ्रष्टाचार, समाजात वाढत आहेत. अशा परिस्थितीत लोकशाहीचे व संविधानाचे संरक्षण होणे डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत होते. त्यांनी स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने आयुष्यभर प्रयत्नाची शिकस्त केली.

संदर्भ

1. शेंडगे श्रीरंग (संपा). डॉ. बाबासाहेब आंबेडकर. नागपुर. चंद्रकांत प्रकाशन.
2. य.दि. फडके. (१२ नोव्हेंबर १९८६). डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह. पुणे. सुगावा प्रकाशन.
3. रामटेक शि.ना. झुंबरलाल कांबळे. संजिता तारदाळकर. (ऑक्टोबर २०१०). बाबासाहेबांच्या सहवासातील सुवर्णक्षण. तृतीय आवृत्ती. पुणे. सुगावा प्रकाशन.
4. डॉ. पगारे हरिभाऊ. वैचारिकता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची.
5. आंबेडकर बाबासाहेब. हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती. सुगावा प्रकाशन. पुणे.
6. आंबेडकर बाबासाहेब. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे. मुक्तांगण प्रकाशन.
7. जाधव नरेंद्र. प्रज्ञा मानवाची. बुद्ध आणि त्यांचा धम्म डॉ.बाबासाहेब आंबेडकर समग्र लेखन कार्य.भाग ४. मुंबई. २०१३.



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

111